


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७६ वे/अंक ११८ वा ■ ■ अमरावती, रविवार,दिनांक १४ डिसेंबर २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २४ मार्गशिर्ष १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




# ...तर थेट मुख्य सचिवांवरच हक्कभंग आणू

## राहुल नार्वेकरांचा विधानसभेत संताप



नागपूर दि. १३ : महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. हे अधिवेशन आता सांगतेकडे आले आहे. या अधिवेशानात अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा सुरू आहेत. विरोधक अनेक प्रश्नांवरून सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न करताना पाहायला मिळत आहेत. अशातच लक्षवेधी सूचनांची उत्तरे किंवा निवेदने येत नसल्याचा मुद्दा सत्ताधारी सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी नरजेस आणून दिला. यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाराजी व्यक्त करत स्पष्ट निर्देश दिले.

हिवाळी अधिवेशनाचा आता शेवटचा दिवस आला आहे. अध्यक्ष म्हणून उत्तम कामकाज करत आहात. एका गोष्टीची खंत आहे, त्याबाबत तुम्ही न्याय द्यावा. आम्ही सदस्य लक्षवेधी मांडतो. आतापर्यंत साधारण असा परिपाठ होता की, लक्षवेधी मांडल्यावर त्यापैकी काही लक्षवेधी सभागृहात येतात आणि काही लक्षवेधींची उत्तरे शेवटच्या दिवशी पटलावर ठेवली जायची. ही पद्धत काही अधिवेशनापासून दिसत नाही, याकडे सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले.

**मुख्य सचिव किंवा सरकारपेक्षा आपण उच्च पदावर आहात**

पुढे बोलताना सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, मी तुम्हाला *(उर्वरित पान २ वर)*

# भाजप- शिंदेसेनेचे पुन्हा फिस्कटणार ?

## १३ महापालिकांवरून महायुतीत रस्सीखेच

नागपूर दि. १३ : महापालिका निवडणुकीतील जागावाटपाबाबत एकनाथ शिंदेंच्या देवगिरी बंगल्यावर एक बैठक पार पडली... या बैठकीला भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणही उपस्थित होते...या बैठकीत महापालिका निवडणुकीत महायुती एकत्र निवडणुक लढवणार असल्याचं ठरलं असलं तरी १३ महापालिकांमध्ये महायुतीतील मित्रपक्षांपुढे मोठा पेच निर्माण झालाय..

**१३ महापालिकांमध्ये युतीचा पेच**

भाजप-शिंदेसेना युती झाल्यास बंडखोरी अटळ

भाजपच्या जागांवर शिंदेसेनेचे बंडखोर उभे राहणार?

शिंदेसेनेच्या जागांवर भाजपमधून बंडखोरीची शक्यता

राष्ट्रवादीही सोबत राहिल्यास जागावाटपात अधिक गुंतागुंतीचं

नवी मुंबईत भाजप विरुद्ध शिंदेसेना थेट संघर्ष

छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगावमध्ये युती कायम ठेवण्याचं आव्हान

दरम्यान महायुतीत ठाणे हे वादाचा केंद्रबिंदू ठरणार आहे...ठाण्यात शिंदेसेनेकडे ८२ माजी नगरसेवकांचा मोठा आकडा असल्यानं भाजपच्या प्रभावातील २४ जागाही शिंदेसेनेसाठी सोडाव्या लागतील... दुसरीकडे कल्याण-डोंबिवली *(उर्वरित पान २ वर)*

# राकेश ओला अमरावतीचे नवे पोलीस आयुक्त

अमरावती,दि.१३ : अमरावतीचे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या बदली झाली असून त्यांच्या जागी बृहन्मुंबई येथील उपआयुक्त राकेश ओला यांची नियुक्ती करण्यात आली आहेत.



राकेश ओला २०१२ च्या तुकडीचे आयपीएस अधिकारी आहेत. राकेश ओला सरळ भरतीने सहाय्यक पोलीस अधिक्षक म्हणून पोलीस दलात दाखल झाले होते. सप्टेंबर २०१४ मध्ये त्यांना नगर जिल्ह्यात श्रीरामपूर येथे नियुक्ती मिळाली होती. त्यावेळी तोतया पोलीस बनून लूटणाऱ्या इराणी टोळीला त्यांनी पकडण्यात यश मिळविले होते. बृहमुंबई पूर्वी ते अहिल्यानगर येथे पोलीस अधिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांची बृहन्मुंबई येथे पोलीस उपआयुक्त म्हणुन बदली करण्यात आली होती.

# महायुतीमध्ये पुन्हा नाराजीचा सूर, सुधीर मुंगटीवारांसह सत्तेतील आमदार सरकारच्या कामावर नाखूश

नागपूर दि.१३ : गेल्या तीन अधिवेशनांपासून राज्यांमध्ये विरोधी पक्षनेता नेमला जात नसल्याने महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून महायुती सरकारवर टीका केली जातेय. त्याचवेळी आता महायुतीमधील आमदार सरकारच्या कारभारावर नाखूश आहेत. सरकारलाच घरचा आहेर देत आहेत. माजी मंत्री ज्येष्ठ भाजप नेते सुधीर मुनगंटीवार आणि नरहरी झिरवाळ यांनी एफडीएच्या कामकाजावर काल जाहीर नाराज व्यक्त केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजकुमार बडोले यांनीही आपली नाराजी बोलून दाखवलीय.



बहुजन समाज,अनुसूचित जाती-जमाती व मागासवर्गीय समाजाच्या प्रश्नांना सभागृह कामकाजात स्थान दिले जात नसल्यानं ते सरकारवर नाराज आहेत. त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केली आहे. कामकाजामध्ये सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, बहुजन कल्याण विभाग व दिव्यांग कल्याण विभाग यांच्याशी संबंधित कोणत्याही प्रश्नांना स्थान देण्यात आलं नाहीये.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व छत्रपती शाहू महाराजांनी शोषीत वंचित आणि बहुजन समाज हक्कांसाठी जे विचार मांडले त्यानुसार या समाजाशी निगडित प्रश्नांना सभागृहाच्या कामकाजात स्थान मिळणे अत्यावश्यक आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आदिवासी व बहुजन समाज यांच्याशी संबंधित अनेक प्रश्न विविध आमदारांनी नियमानुसार दाखल केले असूनही त्या प्रश्नांना कामकाजात स्थान देण्यात आले नाही. ही अतिशय गंभीर आणि चिंताजनक बाब असल्याचं राजकुमार बडोले यांनी आपल्या पत्रामध्ये म्हटलंय.

त्यामुळे महायुती सरकारच्या कारभारावर आमदार असमाधानी, आहेत असं चित्र दिसून येत आहे. एफडीएच्या कामकाज पद्धतीवर सत्ताधारी भाजपच्या आमदारांनीही सडकून टीका केली होती. भर सभागृहामध्ये आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी एफडीएच्या कामकाजावरून कान *(पान २ वर)*

# महापालिका निवडणुकीत युतीबाबत चर्चा करून एकत्र निर्णय बसून घेऊ : अजित पवार

नागपूर दि. १३ : मुंबईसह राज्यातील पालिका निवडणुकीबाबत शिंदेसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. शिंदेसेना आणि भाजपने एकत्रितपणे महापालिका निवडणूक लढण्याबाबत या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. नवाब मलिक यांना निवडणूक प्रक्रियेत सक्रीय सामील केल्यामुळे अजित पवार गटासोबत न जाण्याची भूमिका भाजपाने घेतली आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली.




पत्रकारांशी बोलताना अजित पवार यांनी सांगितले की, महायुतीला धक्का लागेल, असे कोणतेही वक्तव्य कधीही केलेले नाही. महायुतीतील तीनही पक्षांमधील नेते आपली मते *(पान २ वर)*

## माहोल....




काही नाही झाले ,नगरपालिका निवडणूक झाली पण अजून निकाल नाही म्हणून यांची झोप उडाली आहे...




# शनि मंदिराचा कारभार पुन्हा विश्वस्तांकडे

अहिल्यानगर दि. १३ : देशभरात प्रसिद्ध असलेल्या अहिल्यानगर येथील शनि मंदिर विश्वस्तमंडळ बरखास्त करून प्रशासकाच्या हाती दिलेला कारभार उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पुन्हा विश्वस्त मंडळाकडे देण्याचा आदेश दिला असल्याची माहिती सचिव आप्पासाहेब शेटे यांनी दिली आहे. गेल्या काही वर्षांपासून शनी विश्वस्त मंडळाचा वाद कोर्टामध्ये गेला होता. यात काही महिन्यांपूर्वी औरंगाबाद खंडपीठाने विश्वस्त मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमणुकीचा *(पान २ वर)*

# सोयाबीन, धानाला बोनस देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्या : विजय वडेट्टीवार

नागपूर दि. १३ : राज्यातील शेतकऱ्याच्या आत्महत्यांचे पाप महायुती सरकारचे आहे अशी टीका अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी केली. राज्यातील विविध गंभीर समस्यांवरून सत्ताधारी पक्षावर जोरदार टीका करत शेतकरी आत्महत्या, कृषी क्षेत्रातील निधीचा अपव्यय, ढासळलेली कायदा आणि सुव्यवस्था, महिला व बालकांवरील वाढते अत्याचार तसेच भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरून काँग्रेसचे नेते वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला.



राज्यात दररोज ८ शेतकरी आत्महत्या करत आहे. अतिवृष्टीने राज्यातील २८ जिल्ह्यांना फटका बसला. सरकारने ३१ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली.पण हे पॅकेज कागदावर राहिलें. कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रती हेक्टर १८,५०० रुपये मदतीचे गाजर दाखवले, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या पदरात फक्त ८,५०० रुपये मिळाले. कृषी विभागाला ६,००० कोटी रुपयांची गरज असताना सरकारने शेतकऱ्यांसाठी केवळ ६१६ कोटी रुपये दिले. चार महिन्यांपूर्वी 'कृषी समृद्धी' योजनेची मोठी घोषणा केली, पण आजपर्यंत या योजनेसाठी *(पान २ वर)*

# सगळा महाराष्ट्र लुटून झाला, आता बाजार समित्या तरी शिल्लक ठेवा : राजू शेट्टी



मुंबई दि. १३ : आज विधिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील ८० हजार मेट्रीक टनापेक्षा जास्त उलाढाल करणाऱ्या महत्त्वाच्या बाजार समिती अध्यक्षपदी मंत्री आणि उपाध्यक्षपदी राज्यमंत्री तर सदस्य म्हणून काही आयएएस अधिकारी व दोन ते तीन शेतकरी प्रतिनिधी ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यावरुन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सरकारवर सडकून टीका केली.

इथेही लुटता *(पान २ वर)*

**अमरावती येथे भव्य रुद्राक्ष प्रदर्शन व विक्रीचे आयोजन**

**14 ते 21 डिसेंबर**
**स.१०.३० ते ९ पर्यंत**



अमरावती :- हैदराबाद येथील इंडस नेपाळ रुद्राक्ष संस्थेच्या वतीने हॉटेल ग्रेस ईन, म.न.पा. (A.M.C) संकुल, राजापेठ पोलीस स्टेशन जवळ, राजापेठ, अमरावती येथे रुद्राक्षांचे प्रदर्शनी आणि विक्री दिनांक 14 डिसेंबर ते 21 डिसेंबर 2025 रोजी आयोजित केली आहे सदर प्रदर्शन सकाळी 10.30 ते रात्री 9 पर्यंत सुरु राहणार आहे. एकमुखी रुद्राक्षपासून 21 मुखी रुद्राक्षापर्यंत सर्व रुद्राक्ष प्रदर्शनात विक्रीस उपलब्ध राहणार आहेत. रुद्राक्ष धारण करणे शुभदायकमानले जाते. तसेच एखाद्याच्याजन्मदिनांकावर आधारित रुद्राक्ष हवे असल्यास वेदगणित शास्त्रानुसार रुद्राक्ष देण्यात येईल. त्यासाठी पंचाग अथवा कॉम्प्युटरची आवश्यकता नाही. असे रुद्राक्षसंबंधी माहिती देताना नेपाळ इंडस रुद्राक्ष संस्थेचे संचालक डॉ. नरेंद्र काशीरेड्डी यांनी सांगितले. प्रदर्शनामध्ये विक्री झालेले रुद्राक्ष नकली असल्याचे सिध्द झाल्यास विकत घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम आम्ही देतो. सिध्दमाळा, जपमाळा, स्पटिकमाळा, शिवमाळा, ज्ञानमाळा अशा विविध प्रकारच्या रुद्राक्ष माळा प्रदर्शनात ग्राहकांना पाहायला मिळतील. अधिक माहतीसाठी 7097296666 या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.







■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम